**Time : 3 hours** **Marks: 100**

1. **All questions are compulsory**
2. **Q. no. 1 & Q.6 carries 20 marks.**
3. **Q.2, 3, 4 & 5 carries 15 marks**
4. **Use of simple calculator is allowed.**

**Q.1 A) MULTIPLE CHOICE QUESTIONS. (any 10)** **10**

1. RBI is a _______.
   a) Statutory company b) Registered company
   c) Listed company d) Chartered company
2. Discounted bill of exchange is a______.
   a) Contingent Liability b) Current liability
   c) Non-Current Liability d) Fixed Liability
3. Partly paid shares can be made fully paid by capitalizing________.
   a) General reserve c) Securities Premium
   b) Capital Redemption Reserve d) All of the above
4. Bonus shares cannot be issued by capitalizing________.
   a) Revaluation reserve c) Capital Reserve
   b) Securities premium d) General Reserve
5. Discount on issue of Debentures is a______.
   a) Capital loss c) Revenue loss
   b) Capital profit d) Revenue profit
6. The Companies Act 2013________.
   a) Prescribes restrictions on issue of debentures at discount
   b) Does not prescribe any restrictions on issue of debentures at discount
   c) Provides no issue of debentures at discount
   d) All of the above
7. The reserve which cannot be transferred to Capital Redemption Reserve____.
   a) Securities premium A/c c) Revaluation Reserve
   b) Profit prior to incorporation d) All of the above
8. A company can issue_____.
   a) Only redeemable preference shares c) Only Deferred shares
   b) Only irredeemable preference shares d) All of the above
9. Debentures may be redeemed out of_______.
   a) Capital b) Profit
   c) Conversion into shares d) All of the above
10. Capital Reserve is________.
   a) Current year's profit b) Past accumulated profits
   c) Capital profit d) Divisible profit


EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F
munotes.in

11. For computation of pre-incorporation profit carriage on purchases is _____.
    a) Allocated in sales ratio b) Allocated in purchase ratio
    c) Debited to pre-incorporation period d) Debited to post-incorporation period
12. For computation of pre-incorporation profit travelling expenses are allocated in ______.
    a) Pre-incorporation period b) post incorporation period
    c) In sales ratio d) In time ratio

**Q.1 B) TRUE OR FALSE (any 10)** **10**

1. Loose tools are shown under current liabilities.
2. Short term loan is the loan due for more than 5 years.
3. Calls in arrears is added to subscribed capital.
4. The document inviting offer from public for subscription is share certificate.
5. Rate of underwriting commission in case of debentures cannot exceed 10%.
6. Issue of debentures must be sanctioned by state government.
7. Capital redemption reserve is used for payment of dividend
8. Capital reserve is a divisible profit.
9. Preference shareholders have voting rights.
10. Preference shares may be convertible into equity shares.
11. For computation of pre-incorporation profit advertisement expenses are allocated in time ratio.
12. Profit prior to incorporation is available for payment of dividend.

**Q.2 The Balance Sheet of Straight Ltd. As on 31st March, 2017 was as under:**

| Liabilities | ₹ | Assets | ₹ |
|---|---|---|---|
| **Share Capital:** | | Fixed Assets | 15,00,000 |
| 25,000 Equity Shares of ₹ 100 | | Investment | 10,00,000 |
| each fully paid | 25,00,000 | (M.V. ₹ 10,10,000) | |
| 10,000 9% Redeemable | | Bank Balance | 50,000 |
| Preference shares of ₹ 100 each | | Other current assets | 20,20,000 |
| ₹ 90 per share paid up | 9,00,000 | | |
| General Reserve | 3,00,000 | | |
| Profit & Loss A/c | 3,19,000 | | |
| Dividend Equalization Reserve | 2,00,000 | | |
| Sundry Creditors | 3,51,000 | | - |
| | 45,70,000 | | 45,70,000 |

On 1st April, 2017; the company made a call of ₹ 10 each on its preference shares and call money was duly received. All preference shares were redeemed at a premium of 2%. The company sold all its investment at market value. For the purpose of redemption, the company issued minimum number of equity shares at a premium of


EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

10% after utilising available resources to the maximum extent, keeping in view the provisions of the Companies Act, 2013. All preference shareholders were paid off, except one shareholder holding 150 preference shares.

Pass Journal Entries in the books of the company assuming that redemption is duly carried out.

**OR**

**Q. 2 Following is the Balance sheet of Moonlight Ltd. as on 31st March, 2017.**

| Liabilities | ₹ | Assets | ₹ |
|---|---|---|---|
| 2,000 – 8% Redeemable Preference shares of ₹ 100 each, fully paid | 2,00,000 | Fixed Assets | 15,75,000 |
| 1,00,000 Equity Shares of ₹ 10 each, fully paid | 10,00,000 | Bank | 2,18,000 |
| Securities Premium | 35,000 | Investments (Market value ₹ 1,90,000) | 1,50,000 |
| Profit & Loss Account | 4,50,000 | | |
| Sundry Creditors | 2,58,000 | | |
| | 19,43,000 | | 19,43,000 |

On the above date the Directors of the company took following steps to redeem 8%. Preference shares at a premium of 5%:

a) The company issued 4,000 Equity shares of ₹ 10, at a premium of ₹ 2 per share for the purpose of redemption of preference shares.

b) Investment were sold at market price.

c) All the payments were made to the preference shareholders except those holding 100 shares who could not be traced.

You are required to pass necessary journal entries in the books of Moonlight Ltd. Complying with requirements of Companies Act 2013.

**Q.3** Roshan Ltd. gave notice of its intention to redeem its outstanding ₹ 4, 00,000, 8% debenture at ₹ 105 (nominal value ₹ 100) and offered the following options to the holders:

a) 11% preference share of ₹ 40/- each at ₹ 50 per share.

b) 10% debenture at ₹ 100 (at par).

c) To have their holdings redeemed for cash. Assume redemption out profit only.

1) The holders of ₹ 1, 40,000 debenture accepted option (a).

2) The holders of ₹ 1, 60,000 debentures accepted option (b).

3) The remaining debenture holders accepted option (c).

Pass the necessary journal entries in the books of Roshan Ltd.


EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

**OR**

**Q.3** The following balance appeared in the books of Paradise Ltd. on 1-4-2012:

i. 12% Debentures ₹ 7,50,000
ii. Balance of Sinking Fund ₹ 6,00,000
iii. Sinking Fund investment ₹ 6, 00,000 represented by 10% ₹ 6, 50,000 secured bonds of Government of India.

Annual contribution to the sinking funds was ₹ 1, 20,000 made on 31st March each year. On 31-03-2013, balance at bank was ₹ 3, 00,000 before receipt of interest. The company sold the investment at 90% for redemption of debenture at a premium of 10% on the above date.

You are required to prepare the following accounts for the year ended 31st March, 2013.

1. Debentures Account
2. Sinking Fund Account
3. Sinking Fund Investment Account
4. Bank Account
5. Debentureholders Account

**Q.4** A limited, a trading company decided that the value of its building could be used to provide additional working capital. The Balance Sheet of the company as on 31st March, 2018 was as under:

| Liabilities | ₹ | Assets | | ₹ |
|---|---|---|---|---|
| Paid up Capital: | | Fixed Assets: | | |
| 10,000 Equity Shares of ₹ 10 each | 1,00,000 | Building at cost | 2,00,000 | |
| | | Less: Depreciation | 40,000 | 1,60,000 |
| 5,000 12% Redeemable | | Furniture at cost | 90,000 | |
| Preference Shares of ₹ 10 each | 50,000 | Less: Depreciation | 30,000 | 60,000 |
| **Reserves & Provisions:** | | **Current Assets, Loans and** | | |
| Profit & loss Account | 1,35,000 | **Advances** | | |
| **Secured Loans:** | | Stock | | 58,000 |
| 12% Debentures | 70,000 | Debtors | | 52,000 |
| **Unsecured loans:** | Nil | Bank | | 65,000 |
| **Current Liabilities & Provisions:** | | | | |
| Creditors | 40,000 | | | |
| | 3,95,000 | | | 3,95,000 |

Depreciation on building has been provided @ 2% per annum on cost. The following action was taken

a) The building was sold for ₹ 2, 20,000 to another company, who leased it back to A Limited for 21 Years at annual rent of ₹ 16,000.
b) 12% Debentures were discharged at a premium of 10%.
c) Preference Shares were redeemed at a premium of 10%.

The directors expect that the profit of the company will further increase by ₹ 20,000 for the coming year due to change in working capital.


EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

You are required to draft the necessary journal entries to record the above transactions.

**OR**

**Q.4** On 1st January, 2013 XYZ Limited issued 10,000 fifteen years debentures of ₹ 100 each bearing interest at 10% p.a. One of the conditions of issue was that the company could redeem the debentures by giving six month's notice at any time after 5 years, at a premium of 4%, either by payment in cash or by allotment of preference shares and / or other debenture at the option of the debentureholders.

On 1st April, 2018 the company gave notice to the debentureholders of its intention to redeem the debentures on 1st October, 2018 either by payment in cash or by allotment of 11% preference shares of ₹ 100 each at ₹ 130 per share or 11% second Debentures of ₹ 100 at ₹ 96 per debenture.

Holders of 4,000 debentures accepted the offer of the preference shares; holders of 4,800 debentures accepted the offer of the 11% second debentures and the rest demanded cash on 1st, October, 2018.

**Required:**

Give the journal entries to give effect to the above as of 1st October, 2018. Suggest how discount on issue of debentures can be dealt in the accounts. Ignore interest.

**Q.5** ABC Ltd. was incorporated to take over the running business of BC and CI brothers with effect from 1st April, 2017. The Company was incorporated on 1st August, 2017.

The following information was available from the books of accounts, which were closed on 31st March, 2018.

| | | ₹ |
|---|---|---|
| Gross profit | 7,00,000 | |
| Shares transfer fees received | 10,000 | 7,10,000 |
| Expenses: | | |
| Office Salaries | | 2,10,000 |
| Partner's Salaries | | 60,000 |
| Advertising | | 63,000 |
| Printing Stationery | | 15,000 |
| Travelling Expenses | | 40,000 |
| Office Rent | | 96,000 |
| Auditor's Remuneration | | 6,000 |
| Directors' Fees | | 10,000 |
| Bad Debts | | 12,000 |
| Sales Commission | | 49,000 |
| Preliminary Expenses | | 7,000 |
| Debenture Interest | | 16,000 |
| Interest on capital | | 18,000 |
| Depreciation | | 21,000 |


EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F
munotes.in

**Additional Information:**

1. Monthly sales were ₹ 5, 00,000 for pre-incorporation period, while total sales for the year were ₹ 70, 00,000.
   The sales were arose evenly throughout the concerned periods.
2. Office rent was ₹ 84,000 p.a. upto 30th September, 2017.
   It became ₹ 1, 08,000 p.a. thereafter.
3. Travelling expenses included ₹ 7,000 towards sales promotion.
4. Auditor's Remuneration was payable for the whole year.
5. Bad debts written off included a debt of ₹ 4,000 taken over from the vendor, while the remaining were in respect of goods sold in September, 2017.
6. Depreciation includes ₹ 6,000 for asset acquired in the post incorporation period.

Prepare profit & Loss account for the year ended 31st March, 2018 in the columnar form showing profit/ loss for the pre and post incorporation period.

**OR**

**Q.5** Nishan Ltd. was incorporated on 1st August, 2017 to acquire a business as on 1st April, 2017. The first accounts were closed on 31st March, 2018.

The following items appeared in the Profit and Loss Account.

**Profit & Loss A/c**

**For the year ended 31st March, 2018**

| | ₹ | | ₹ |
|---|---|---|---|
| Director's Fees | 49,000 | By Gross Profit | 9,60,000 |
| Rent | 85,500 | | |
| Bad Debts | 12,000 | | |
| Salaries | 1,83,000 | | |
| Interest on Debenture | 24,000 | | |
| Depreciation | 66,000 | | |
| Preliminary Expenses | 42,000 | | |
| General Expenses | 49,200 | | |
| Commission on sales | 36,000 | | |
| Printing & stationary | 93,000 | | |
| Advertising | 1,20,500 | | |
| Audit Fees | 58,600 | | |
| Carriage Outwards | 72,800 | | |
| Electricity Charges | 44,400 | | |
| Insurance Premium | 24,000 | | |
| | 9,60,000 | | 9,60,000 |

**Additional Information:**

1. Rent is paid on the basis of floor space occupied . The floor space occupied was doubled in the post incorporation period.


EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

2. Sales for each month of December, 2017 to March, 2018 were double the monthly sales of April to November, 2017.
3. Bad debts ₹ 500 were in respect of sales effected two years ago.
4. Mr. Amit was working partner in the firm entitled to a remuneration @ ₹ 12,000 p.m. from 1st August, 2017 he was managing directors of a company entitled to salary @ ₹ 15,000 p.m. The remaining salary is to two Clerks employed during the period 1st July to 30th November, 2017.

You are required to prepare Profit & Loss Account for the year ended 31st March, 2018 and show 'pre' and 'post' incorporation profit or loss.

**Q.6** a) Explain different types of debentures (10)

b) What rules must be complied for issue of Bonus shares ? (10)

**OR**

**Q.6 Write short notes (any 4)**

1. Sources of Bonus issue.
2. Sweat Equity shares.
3. Issue of Debentures as collateral security.
4. Divisible Profit.
5. Profit prior to incorporation.
6. Writing off discount on issue of debentures.

***********************

munotes.in



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

**वेळ : ३ तास** **गुण : १००**

सूचना: १) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत

२) प्र. क्र. १ व प्र. क्र. ६ ला २० गुण आहेत.

३) प्र. क्र. २,३,४, आणि ५ हे १५ गुणांचे आहेत.

४) साधे गणकयंत्र वापरण्याची परवानगी आहे.

५) इंग्रजी प्रश्न प्रमाण मानावेत.

प्र. १ अ) बहुपर्यायी प्रश्न. (कोणतेही १०) (१०)

१. आरबीआय एक ---------आहे

अ) वैधानिक कंपनी ब) नोंदणीकृत कंपनी

क) सूचीबद्ध कंपनी ड) चार्टर्ड कंपनी

२. बँकेकडे वटवलेली हुंडी हे -----------------आहे

अ) आकस्मित दायित्व ब) वर्तमान दायित्व

क) बिगर चालू दायित्व ड) मुदत दायित्व

३. अंशतः देय भाग हे -------------------चे भांडवलीकरण करून पुर्ण देयकेले जाऊ शकतात.

अ) सर्वसाधारण राखीव निधी क) भाग अधिभार

ब) भांडवली विमोचन राखीव निधी ड) वरील सर्व

४. बोनस भाग वाटप करणेसाठी ----------चे भांडवलीकरण करता येत नाहीत

अ) पुनरमुल्यांकन राखीव निधी क) भांडवली राखीव निधी

ब) भाग अधिभार ड) सर्वसाधारण राखीव निधी

५. कर्जरोखे विक्रीवरील सवलत हा ----------------आहे.

अ) भांडवली तोटा क) महसूली तोटा

ब) भांडवली लाभ ड) महसूली नफा

६. कंपनी कायदा २०१३ नुसार ------------------------

अ) सवलतीच्या दरात कर्जरोखे विक्रीवर निर्बंध लादले आहेत

ब) सवलतीच्या दरात कर्जरोखे विक्रीवर कोणतेही निर्बंध लादलेले नाहीत

क) सवलतीच्या दराने कर्जरोखे विक्रीस कोणतीही मुभा मिळत नाही

ड) वरील सर्व

७. जो राखीव निधी भांडवली विमोचन राखीव निधीला हस्तांतरित करता येणार नाही तो ---- होय.

अ) भाग अधिभार खाते क) पुनर मुल्यांकन राखीव निधी

ब) स्थापना पूर्व लाभ ड) वरील सर्व

८. कंपनी ----------- ची विक्री करू शकते

अ) फक्त विमोचनीय आग्रहक्काचे भाग क) फक्त स्थगित भाग

ब) फक्त अविमोचनीय अग्रहक्काचे भाग ड) वरील सर्व

९. कर्जरोखे परतफेड ---------मधून केली जाऊ शकते.

अ) भांडवल ब) नफा

क) भागांमध्ये रुपांतर करुन ड) वरील सर्व



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

munotes.in

१०. भांडवल राखीव---------------- आहे

अ) चालू वर्षांचा नफा　　　　ब) मागील जमा नफा

क) भांडवली नफा　　　　ड) विभागणी योग्य नफा

११. स्थापना पूर्व लाभ काढणेसाठी खरेदीसाठी केलेला भाडे खर्च ______.

अ) विक्री प्रमाणात वाटला जातो　　　　ब) खरेदीच्या प्रमाणात वाटप केले जाते

क) स्थापना पूर्व कालावधीला नावे करावा.　　　　ड) स्थापना नंतर कालावधीस नावे करावा.

१२. स्थापना पूर्व नफा काढणेसाठी प्रवास खर्च हि बाब _______ वाटप केली जाते.

अ) स्थापना पूर्व कालावधीला　　　　ब) स्थापना नंतर कालावधीस

क) विक्री प्रमाणात　　　　ड) वेळेच्या प्रमाणात

प्र .१ ब) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा (कोणतेही १०) १०

१. किरकोळ उपकरणे हि चल मालमत्ता या गटात दाखवली जातात.

२. अल्प मुदतीचे कर्ज हे ५ वर्षांहून अधिक कालावधीसाठी दिले जाते.

३. थकबाकी ही विक्री झालेल्या भाग भांडवलामध्ये मिळविली जाते..

४. लोकांना वर्गणीसाठी आमंत्रित करणारे कागदपत्र म्हणजे भाग प्रमाणपत्र होय.

५. कर्जारोख्यांसाठी भागविमा कमिशनचा दर १०% पेक्षा जास्त असू शकत नाही.

६. कर्जारोख्यांच्या विक्रीसाठी राज्य सरकारकडून परवानगी घेणे आवश्यक आहे.

७. भांडवल विमोचन निधी हा लाभांश देणेसाठी वापरला जातो.

८. भांडवली राखीव निधी हा वाटप योग्य नफा आहे.

९. अग्रहक्क भागधारकांना मतदानाचा अधिकार आहे.

१०. अग्रहक्क भाग हे समभागांमध्ये परिवर्तनीय असू शकतात.

११. स्थापना पूर्व नफा काढणेसाठी जाहिरात खर्च ही बाब वेळेच्या प्रमाणात वाटप केली जाते.

१२. स्थापना पूर्व नफा हा लाभांश वाटपासाठी उपलब्ध असतो.

प्र.२ ३१ मार्च २०१७ रोजीचे स्ट्रेट लिमिटेडचे ताळेबंद खालीलप्रमाणे आहे:

| देयता | रु. | मालमत्ता | रु. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल: | | स्थिर मालमत्ता | १५,००,००० |
| पूर्ण जमा झालेले प्रती रु. १०० चे २५,००० | | गुंतवणूक | १०,००,००० |
| समभाग | २५,००,००० | (बाजार भाव रु.१०,१०,०००) | |
| १०,००० परत फेडीचे अग्रहाक्काचे भाग ९% | | बँक शिल्लक | ५०,००० |
| दराचे प्रत्येक रु. १०० प्रमाणे प्रत्येकी रु. ९० | | इतर चल मालमत्ता | २०,२०,००० |
| जमा | ९,००,००० | | |
| सामान्य राखीव निधी | ३,००,००० | | |
| नफा व तोटा लेखा | ३,१९,००० | | |
| लाभांश समिकरण निधी | २,००,००० | | |
| धनको | ३,५१,००० | | |
| | **४५,७०,०००** | | **४५,७०,०००** |



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

१ एप्रिल, २०१७ रोजी कंपनीने त्याच्या अग्रहक्काच्या भागांवर प्रत्येकी रु. १० प्रमाणे येणे असलेली रक्कम मागविली आणि ती वेळेवर जमा झाली. सर्व परतफेडीचे अग्रहक्काचे भाग २% अधिमुल्यासह परत केले. कंपनीने सर्व गुंतवणुकी बाजार किमतीने विकून टाकल्या. परतफेड करण्यासाठी कंपनीने कंपनी अधिनियम २०१३ च्या तरतुदी लक्षात घेऊन उपलब्ध असलेल्या स्त्रोतांचा जास्तीत जास्त वापर केल्यानंतर १०% आधीमुल्यासह किमान समभाग विक्रीस काढले. फक्त १५० भाग धारण केलेला एक भागधारक सोडून सर्व अग्रहाक्काचे भाग परत फेड केले.

परत फेड योग्य झाली असे गृहीत धरून कंपनीच्या पुस्तकामध्ये नोंदी करा.

**किंवा**

प्र.२ ३१ मार्च २०१७ रोजीचे मूनलाइट लिमिटेडचे ताळेबंद खालीलप्रमाणे आहे:

| देयता | रु. | मालमत्ता | रु. |
|---|---|---|---|
| २,००० परत फेडीचे अग्रहाक्काचे भाग ८% दराचे प्रत्येक रु. १०० प्रमाणे पुर्णजमा | २,००,००० | स्थिर मालमत्ता | १५,७५,००० |
| | | बँक शिल्लक | २,१८,००० |
| पूर्ण जमा झालेले प्रती रु. १० चे १,००,००० समभाग | १०,००,००० | गुंतवणूक (बाजार भाव रु.१०,१०,०००) | १,५०,००० |
| भाग अधिमुल्य | ३५,००० | | |
| नफा व तोटा लेखा | ४,५०,००० | | |
| धनको | २,५८,००० | | |
| | **१९,४३,०००** | | **१९,४३,०००** |

वरील तारखेला कंपनीच्या संचालकांनी ८% अग्रहाक्काचे भाग ५% अधिमुल्यासह परत करणेसाठी खालील टप्प्यांचे अनुसरण केले.

अ) कंपनीने अग्रहाक्काचे भाग परत करणेसाठी प्रती रु.१० चे ४,००० समभाग २% अधिमुल्यासह विक्रीस काढले.

ब) गुंतवणूक बाजारभावाने विकली गेली.

क) एक १०० भाग धारण केलेला भागधारक शोधात आला नाही त्यामुळे त्याच्या व्यतीरिक्त सर्व अग्रहक्का भागधारकांना परत फेड केली गेली.

कंपनी कायदा २०१३ च्या आवश्यकता लक्षात घेऊन तूम्हाला मूनलाइट लिमिटेडच्या पुस्तकात वरील व्यवहारांसाठी नोंदी करावयाच्या आहेत.

प्र. ३ रोशन लि. ने आपल्या थकीत रु. ४,००,००० ८% कर्जरोखे धारकांना प्रती रु. १०५ (दर्शनी किंमत रु. १००) प्रमाणे परतफेडीसाठी सूचना दिली आणि पुढील पर्याय दिले:

अ) प्रती रु. ४० चे ११% दराचे अग्रहाक्काचे भाग प्रत्येक रु. ५० प्रमाणे.

ब) १०% कर्जरोखे प्रती रु. १०० (सम मूल्याने)

क) रोख रकम देऊन परत फेड (परत फेड नफ्यातून होईल असे गृहीत धरून)

१) १,४०,००० रुपयांच्या कर्जरोखे धारकांनी पर्याय अ स्वीकारला.

२) १,६०,००० रुपयांच्या कर्जरोखे धारकांनी पर्याय ब स्वीकारला.

३) उर्वरित कर्जरोखे धारकांनी पर्याय क स्वीकारला.

वरील व्यवहारांसाठी रोशन लिमिटेडच्या पुस्तकात आवश्यक नोंदी करा.



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

**किंवा**

प्र. ३ ०१/०४/२०१२ रोजी पॅराडाइज लिमिटेडच्या पुस्तकात खालील शिल्लक दिसून आली:

i. १२% कर्जरोखे रु. ७,५०,०००

ii. परतफेड फंडांतील शिल्लक रु. ६,००,०००

iii. परतफेड फंड गुंतवणूक रु. ६,००,००० ही १०% रु. ६,५०,००० भारत सरकारच्या सुरक्षित बॉन्डमध्ये केली.

दरवर्षी ३१ मार्च रोजी वार्षिक वर्गणी रु. १,२०,००० परत फेड फंडामध्ये जमा केली जाते. ३१/०३/२०१३/ रोजी, व्याज प्राप्त होण्याआधी बँकेकडे रु ३,००,००० शिल्लक होते. कंपनीने उपरोक्त तारखेला १०% अधिमुल्याने कर्जरोख्यांची परत फेड करणेसाठी ९०% दराने गुंतवणूक विकली.

३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षासाठी आपल्याला खालील खाती तयार करणे आवश्यक आहे.

१) कर्जरोखे लेखा २) परतफेड फंड लेखा ३) परतफेड फंड गुंतवणूक लेखा
४) बँक लेखा ५) कर्जरोखे धारक लेखा

प्र. ४ ए लिमिटेड या व्यापारी कंपनीने ठरविले की त्याच्या इमारतीचे मुल्य हे अतिरिक्त चल भांडवल प्रदान करण्यासाठी वापरले जाऊ शकते. ३१ मार्च, २०१८ रोजी कंपनीचे ताळेबंद खालीलप्रमाणे होते.

| देयता | रु. | मालमत्ता | | रु. |
|---|---|---|---|---|
| जमा भांडवल: | | स्थिर मालमत्ता: | | |
| प्रत्येकी रु १० चे १०,००० समभाग | १,००,००० | इमारत(खरेदी किंमत | २,००,००० | |
| ५,०००, १२% परत फेडीचे अग्रहाक्काचे | | वजा: घसारा | ४०,००० | १,६०,००० |
| प्रत्येकी रु.१० प्रमाणे | ५०,००० | फर्निचर (खरेदी किंमत) | ९०,००० | |
| राखीव निधी आणि तरतुदी: | | वजा: घसारा | ३०,००० | ६०,००० |
| नफा आणि तोटा खाते | १,३५,००० | **चल मालमत्ता, कर्ज आणि अग्रीमे** | | |
| **सुरक्षित कर्ज:** | | मालसाठा | | ५८,००० |
| १२% कर्जरोखे | ७०,००० | ऋणको | | ५२,००० |
| **असुरक्षित कर्ज:** | ----- | बँक | | ६५,००० |
| चालू देयात आणि तरतुदी: | | | | |
| धनको | ४०,००० | | | |
| | ३,९५,००० | | | ३,९५,००० |

इमारतीच्या खरेदी किमतीवर २% प्रति वर्ष दराने घसारा आकारला आहे. खालील कारवाई केली गेली:

अ) इमारत रु. २,२०,००० मध्ये दुसरया कंपनीला विकली गेली, जी त्या कंपनीने पुन्हा ए लिमिटेडला २१ वर्षासाठी रु. १६,००० वार्षिक भाड्याने दिली.

ब) १२% कर्जरोखे १०% अधिमुल्य देऊन परत केले.

क) अग्रहक्क भागांची १०% अधिमुल्याने परत फेड केली.

संचालकांची अशी अपेक्षा आहे की, चल भांडवलामध्ये बदल केल्यामुळे पुढील येणाऱ्या वर्षामध्ये कंपनीचा नफा २०,००० रुपयांनी वाढेल.

उपरोक्त व्यवहार नोंदविण्यासाठी आवश्यक त्या नोंदी करा.



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

**किंवा**

प्र .४ १ जानेवारी २०१३ रोजी एक्सवायझेड लिमिटेडने १०% दराचे प्रत्येकी १०० रुपये किंमतीचे १५ वर्ष मुदतीचे १०,००० कर्जरोखे विक्रीस काढले. विक्रीच्या वेळीच्या अटींपैकी एक अशी अट होती की कंपनी पाच वर्षांनंतर कोणत्याही वेळी सहा महिन्यांच्या नोटिस देऊन ४% अधिमुल्यासह कर्जरोख्यंची परत फेड करेल. हि परतफेड रोख रकमेतून किंवा अग्रहाक्काचे भाग वाटप करून किंवा कर्जरोखे देऊन यापैकी पर्याय कर्जरोखे धारकांना दिला जाईल.

१ एप्रिल २०१८ रोजी कंपनीने १ ऑक्टोबर २०१८ कर्जरोखे परत करणेसाठी नोटीस दिली. ही परतफेड रोख रकमेतून किंवा रु.१०० चे ११% अग्रहक्क भाग प्रती रु.१३० प्रमाणे किंवा ११% दराचे दुसरे कर्जरोखे प्रती रु. १०० किमतीचे रु. ९६ ला एक याप्रमाणे देण्याचे ठरले.

४,००० धारकांनी अग्रहक्क भागाची ऑफर स्वीकारली; ४,८०० धारकांनी ११% दराच्या कर्जरोख्यांची ऑफर स्वीकारली आणि उर्वरित धारकांनी १ ऑक्टोबर, २०१८ रोजी रोख रकमेची मागणी केली.

तुम्हाला १ ऑक्टोंबर २०१८ पर्यंतच्या व्यवहाराच्या नोंदी करावयाच्या आहेत. कर्जरोखे विक्रीवरील सवलत कशी हाताळता येईल याबाबत सुचना द्या. व्याजाकडे दुर्लक्ष करा.

प्र. ५ एबीसी लि. ची स्थापना १ एप्रिल, २०१७ पासून बीसी आणि सीआय बंधूंच्या चालू व्यवसायाची जबाबदारी घेण्यासाठी करण्यात आली. कंपनी १ ऑगस्ट २०१७ रोजी स्थापन केली गेली.

खालिल माहिती ३१ मार्च, २०१८ रोजी बंद केलेल्या खात्यांमधून उपलब्ध झाली.

| | | रु. |
|---|---|---|
| ढोबळ नफा | ७,००,००० | |
| हस्तांतरण शुल्क प्राप्त झाले | १०,००० | ७,१०,००० |
| खर्च: | | |
| कार्यालय वेतन | | २,१०,००० |
| भागीदारांचे वेतन | | ६०,००० |
| जाहिरात | | ६३,००० |
| मुद्रण स्टेशनरी | | १५,००० |
| प्रवास खर्च | | ४०,००० |
| कार्यालय भाडे | | ९६,००० |
| लेखा परीक्षकांचे मानधन | | ६,००० |
| संचालक 'शुल्क | | १०,००० |
| बुडीत कर्ज | | १२,००० |
| विक्री दलाली | | ४९,००० |
| प्राथमिक खर्च | | ७,००० |
| डिबेंचर व्याज | | १६,००० |
| भांडवलावरील व्याज | | १८,००० |
| घसारा | | २१,००० |



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

**अतिरिक्त माहिती:**

१. स्थापना पूर्व कालावधीसाठी मासिक विक्री ५,००,००० रुपये होती, तर वर्षातील एकूण विक्री रु. ७०,००,००० होती.

   विक्री सर्व संबंधित कालावधीत समान रीतीने विभागली होती.

२. ३० सप्टेंबर २०१३ पर्यंत ऑफिसचे भाडे प्रतीवर्ष रु. ८४,००० होते त्यानंतर ते प्रतिवर्ष रु. १,०८,००० इतके झाले.

३. प्रवास खर्चामध्ये रु. ७,००० समाविष्ट आहेत जे विक्रय वृद्धी साठी खर्च केले होते.

४. लेखापरीक्षकांचे मानधन संपूर्ण वर्षासाठी देय होते.

५. बुडीत कर्जामध्ये विक्रेत्याकडून घेतलेल्या ४,००० रुपायांचा कर्जाचा समावेश आहे तर उर्वरित रक्कम सप्टेंबर २०१७ मध्ये विकलेल्या मालासंदर्भात आहे.

६. घसारामध्ये स्थापना पश्चात कालावधीत घेतलेल्या मालमत्तेसाठीचा घसारा रु. ६,००० समाविष्ट आहे.

३१ मार्च, २०१८ ला संपलेल्या वर्षासाठी स्तंभीय स्वरुपात नफा आणि तोटा खाते तयार करा व स्थापना पूर्व व पश्चात कालावधीसाठी नफा / तोटा दाखवा.

**किंवा**

प्र. ५ १ एप्रिल, २०१७ पासून एक व्यवसाय खरेदी करणेसाठी निशान लिमिटेड स्थापना १ ऑगस्ट २०१७ केली गेली. नफा आणि तोटा खात्यात खालील गोष्टी दिसल्या.

**नफा तोटा खाते**

**३१ मार्च २०१८ रोजी संपलेल्या वर्षासाठी**

| नावे | रु. | जमा | रु. |
|---|---|---|---|
| संचालकांचे शुल्क | ४९,००० | ढोबळ नफा | ९,६०,००० |
| भाडे | ८५,५५५ | | |
| बुडीत कर्ज | १२,००० | | |
| पगार | १,८३,००० | | |
| डिबेंचरवरील व्याज | २४,००० | | |
| घसारा | ६६,००० | | |
| प्राथमिक खर्च | ४२,००० | | |
| सामान्य खर्च | ४९,२०० | | |
| विक्रीवरील दलाली | ३६,००० | | |
| मुद्रण आणि स्टेशनरी | ९३,००० | | |
| जाहिरात | १,२०,५०० | | |
| लेखापरीक्षण शुल्क | ५८,६०० | | |
| विक्रीवरील भाडे खर्च | ७२,८०० | | |
| विज बिल | ४४,४०० | | |
| विम्याचा हप्ता | २४,००० | | |
| | ९,६०,००० | | ९,६०,००० |

munotes.in



EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F

**अतिरिक्त माहिती:**

१. व्यापलेल्या जागेच्या आधारावर भाडे दिले जाते. स्थापना पश्चात कालावधीमध्ये व्यापलेल्या जागेत दुप्पट वाढ करण्यात आली.

२. डिसेंबर, २०१७ ते मार्च २०१८ या महिन्यांच्या विक्री एप्रिल ते नोव्हेंबर २०१७ च्या मासिक विक्रीच्या दुप्पट झाली.

३. बुडीत कर्ज रु. ५०० हे दोन वर्षांपूर्वीच्या विक्रीच्या बाबतीत होते.

४. श्री अमित हे संस्थेमध्ये कार्यकारी भागीदार होते त्यांना दरमहा रु. १२,००० इतके वेतन होते. १ ऑगस्ट, २०१७ पासून ते कंपनीचे व्यवस्थापक संचालक आहेत व त्यांचे दरमहा वेतन रु. १५,००० इतके झाले. उर्वरित पगार १ जुलै ते ३० नोव्हेंबर २०१७ दरम्यान नेमलेल्या दोन लीपिकांचा आहे.

३१ मार्च, २०१८ ला संपलेल्या वर्षासाठी स्तंभीय स्वरुपात नफा आणि तोटा खाते तयार करा व स्थापना पूर्व व पश्चात कालावधीसाठी नफा / तोटा दाखवा.

प्र .६ अ) कर्जरोख्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा. (१०)

ब) बोनस भाग वाटप करताना कोणत्या नियमांचे पालन केले पाहिजे? (१०)

**किंवा**

प्र. ६ थोडक्यात टीपा लिहा (कोणत्याही ४)

१. बोनस भाग वाटपाचे स्त्रोत.
४. विभाज्य नफा
२. स्वीट समभाग
५ स्थापना पूर्व लाभ.
३. दुय्यम तारण म्हणून कर्जरोखे देणे
६. कर्जरोखे विक्रीवरील सवलत खाते बाह्य करणे.

*******************



munotes.in

EEAE2349ABCB479ED71D22BA3212C51F